मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिकेचा डिजिटल कारभार कागदावरच

## ई-ऑफिस प्रणालीस लागेना मुहूर्त : अधिकाऱ्यांच्या टेबलांवरील फाईलींचे ढीग हटेनात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दैनंदिन कामकाजासाठी तयार केलेल्या ई-ऑफिस या नव्या डिजिटल प्रणालीनुसार कामकाजास अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या टेबलांवर फाईलीचे ढीग कायम आहेत. पेपरलेस (कागदाविना) कारभार सुरू न झाल्याने नागरिकांना महापालिका, क्षेत्रीय कार्यालय तसेच, इतर कार्यालयांत वारंवार चकरा माराव्या लागत आहेत.

डिजिटल कारभार महापालिका प्रशासन 1 जानेवारी 2025 पासून सुरू करणार होती. त्यानंतर प्रजासत्ताक दिन 26 जानेवारीला मुहूर्त निश्चित झाला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत 6 फेब्रुवारीला या डिजिटल कारभाराची सुरुवात करण्यात आली. त्यामुळे महापालिकेच्या सर्व विभागांत फेब्रुवारी महिन्यात डिजिटल कामकाज सुरू होईल, अशी शहरवासीयांना अपेक्षा होती.

मात्र, मार्च महिना अर्धा संपला तरी, अद्याप पेपरलेस कारभार काही दिसून येत नाही. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टेबलांसमोर फाईलींचे ढीग कायम आहेत. एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फाईलीचा प्रवास सुरूच आहे. त्यामुळे दैनंदिन कामकाजाने काही गती घेतल्याचे दिसत नाही. परिणामी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, माजी नगरसेवक, पदाधिकारी तसेच, ठेकेदारांच्या प्रतिनिधींना महापालिका व क्षेत्रीय कार्यालयांच्या वारंवार चकरा माराव्या लागत आहेत.



### एक एप्रिलपासून प्रत्यक्ष अंमलबजावणी

» ई-ऑफिस कामकाजाबाबत महापालिकेची सर्व विभागांत तयारी पूर्ण झाली आहे. त्यासंदर्भात आवश्यक चाचण्या घेतल्या आहेत. आयुक्ताच्या आदेशानुसार ही प्रणाली एक एप्रिल 2025 पासून महापालिकेच्या सर्व विभागांत कार्यान्वित केली जाणार आहे, असे महापालिकेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांनी सांगितले.

### तब्बल 112 कोटींचा खर्च करूनही कागदावरच कामकाज

» पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस इनेबल ईआरपी प्रकल्पाअंतर्गत 33 संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. प्रकल्पात मोठ्या प्रमाणातील माहितीचे संकलन करण्यात आले आहे. महापालिकेच्या 1 हजारपेक्षा अधिक प्रक्रियांवर बिझनेस प्रोसेस रि-इंजिनिअरींग करण्यात आले आहे. त्यामुळे महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना अधिक दर्जेदार आणि जलद सेवा प्रदान केली जाईल. ई-ऑफिस कामकाजामुळे पेपरलेस कामकाज होऊन, प्रशासकीय कामकाज सुलभ होईल. सर्व विभागांमध्ये योग्य समन्वय साधून कामकाजात अधिक सुसूत्रता आणली जाईल. ऑनलाईन अर्ज व इतर कागदपत्रे हाताळण्याच्या प्रक्रियेतील गती, अचूकता, पारदर्शकता व सुरक्षा वाढणार आहे. याबाबत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी प्रशस्त इमारत उभारावी; आमदार महेश लांडगे यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

## मोरवाडी येथे संस्थेची इमारत आहे. मात्र, सदर इमारत जुनी झाली असून, ही जागा अपुरी पडत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने शहरात मोरवाडी येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था संचलित केली जाते. मोरवाडी येथे संस्थेची इमारत आहे. मात्र, सदर इमारत जुनी झाली असून, ही जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने आणि राज्य सरकारच्या मदतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीत कायमस्वरुपी नवीन प्रशस्त सोयी-सुविधायुक्त इमारत उभारावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्यस्थितीमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व कासारवाडी येथे 20 ट्रेडसचे प्रशिक्षण देण्यात येते. या ठिकाणी एकूण 42 तुकड्या आहेत. काही दिवसांपूर्वी, महानगरपालिका प्रशासन आणि शहरासह हद्दीलगतच्या औद्योगिक अस्थापना यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतातील उद्योगांच्या भविष्यातील मागण्या पूर्ण करणारे ITI ट्रेड ओळखणे" या विषयावर कार्यशाळा झाली. त्यावेळी महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विस्तारीकरण आणि अपग्रेडेशनबाबत चर्चा झाली होती.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विस्तारीकरण आणि नवीन ट्रेडच्या समावेशानंतर शहर आणि सभोवतालच्या परिसरातील औद्योगिक संस्थांशी समन्वय करता येईल. त्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना नोकरी व रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.





"पिंपरी-चिंचवड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विस्तारासाठी आणि अद्ययावतीकरणासाठी नवीन जागेची निश्चिती करावी. त्या अनुशंगाने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयटीआयची प्रशासकीय इमारत, कार्यशाळा, सेंटर ऑफ एक्सलन्स असे संकूल तयार करावे. यासाठी कौशल्य विकास विषयक बाबींसाठी सुनियोजित व अद्ययावत पद्धतीने पायाभूत सुविधा विकसित कराव्यात, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली. त्या अनुशंगाने सकारात्मक कारवाई होईल, असा विश्वास आहे.

- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पुण्यातील दोन 'एचएसआरपी' केंद्र बंद, वाहनचालकांचा मनस्ताप

## राज्यात 1 एप्रिल 2019 पूर्वीच्या सर्व वाहनांसाठी 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सेक्युरीटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांसाठी 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सेक्युरीटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. येत्या ३० एप्रिल पूर्वी 'एचएसआरपी' न बसवल्यास दंड आकारण्यात येणार आहे. त्यामुळे नवीन नंबर प्लेट बसवून घेण्यासाठी नागरिकांनी घाई केली आहे. मात्र शहरातील दोन फिटमेंट केंद्र अचानक बंद पडल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे.

येत्या ३० एप्रिलपर्यंत वाहनधारकांना 'हाय सेक्युरिटी नंबर प्लेट' लावून घ्यावी लागणार आहे. त्यासाठी राज्यभरात तीन खासगी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. पुण्यात रोझमार्टा ही एजन्सी काम करीत आहे. या एजन्सीची दोन केंद्रे अचानक बंद करण्यात आल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. मात्र ज्या नागरिकांनी नंबर प्लेट बसवण्यासाठी या केंद्रांत बुकिंग केली होती त्या वाहनधारकांना कंपनीकडून फोन केला जाईल. तसेच वाहनधारकांना जवळच्या केंद्रात त्यांच्या सोयीच्या वेळेत नंबर प्लेट बसविण्यासाठी बोलाविले जाईल असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितले.

एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना येत्या एप्रिल अखेरपर्यंत वाहन चालकांनी एचएसआरपी' बसवून घ्यायची आहे. अन्यथा वाहन मालकांना दंडाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. या निर्णयाचा गैरफायदा घेत सायबर चोरट्यांनी उच्च सुरक्षा नोंदणी वाहन क्रमांकाच्या बनावट वेबसाईट सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याची प्रक्रिया शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच करावी असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले होते.

भोसले यांनी सांगितले की, बंद पडलेल्या केंद्रात 'एचएसआरपी' बसविण्यासाठी नोंदणी केलेल्या वाहनधारकांना त्यांच्या जवळच्या केंद्रावर वेळ दिली जाईल. तसेच त्यांच्याकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क घेतले जाणार नाही.




### घरपोच शुल्कातून दिलासा

» नवीन नंबरप्लेट घरपोच मिळवण्याची सुविधा सुरू असून त्यासाठी वाहनधारकाला अतिरिक्त शुल्क द्यावे लागते. दुचाकीसाठी १२५ रुपये तर चारचाकीसाठी २५० रुपये शुल्क आकारले जाते. मात्र वाहनधारकांची संख्या २५ पेक्षा अधिक असल्यास उच्च सुरक्षा नंबर प्लेट घरपोच शुल्कातून दिलासा मिळणार आहे. त्यासाठी समूह आरक्षणाची (ग्रुप बुकिंग) सुविधा लवकरच सुरू केली जाणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार असून सोसायट्या तसेच ऑफिस मधील लोकांना त्याचा फायदा होणार आहे.

### नागरिकांची तारांबळ

» शहरातील 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' बसवणारी दोन केंद्रे अचानक बंद पडल्याने वाहनचालकांना मन:स्तापाला सामोरे जावे लागले. विशेष म्हणजे ही केंद्रे बंद पडल्याचे संबंधित कंपनीला तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयालाही माहिती नव्हते अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर प्रशासनाला जाग आली.

"वाहनधारकांना होणारा त्रास टाळण्यासाठी 'एचएसआरपी' बसविण्यासाठी अधिक केंद्रे सुरू करण्याच्या सूचना वेंडर कंपनीला दिल्या आहेत. तसेच केंद्र बंद झाल्यामुळे तेथे नोंदणी केलेल्या वाहनधारकांना पुन्हा अर्ज करावा लागणार नाही. तसेच त्यांच्या सोयीनुसार 'एचएसआरपी' बसविण्यासाठी तारीख निश्चित केली जाईल."
- स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाचे पाऊल

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी शालेय वाहतूक धोरणांतर्गत विशेष प्रकल्प सुरु केला

**पुणे | प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी शालेय वाहतूक धोरणांतर्गत विशेष प्रकल्प सुरू केला असून, त्या अंतर्गत शाळा परिसरात रस्त्यांवर चिन्हांकित आकृती काढण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी शालेय वाहतूक धोरणांतर्गत विशेष प्रकल्प सुरू केला असून, त्या अंतर्गत शाळा परिसरात रस्त्यांवर चिन्हांकित आकृती काढण्यात येत आहे. त्यामुळे वाहनचालक या भागात आले, की त्यांना वाहन सावकाश चालविण्याची सूचना ठळकपणे मिळेल.

महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी एकत्रितपणे लक्ष्मी रस्ता आणि हुजूरपागा शाळेजवळ पिवळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यांची नक्षी काढली आहे. वाहनचालकांकडूनदेखील या प्रकल्पाला चांगला प्रतिसाद मिळत असून, शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना बिनदिक्कत रस्ता ओलांडता येणे शक्य होत आहे.

पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील शाळा या महत्त्वाच्या रस्त्यांवर आहेत. लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर चौक, केळकर रस्त्यावर प्राथमिक, माध्यमिक शाळा असून, या रस्त्यांवर वाहनांची वर्दळ कायम असते. अनेक विद्यार्थी पायी किंवा सायकलवर शाळेत जातात. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाताना किंवा शाळा सुटल्यानंतर अनेकदा वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. अपघाताचीही शक्यता असते. या पार्श्वभूमीवर महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी एकत्रित येऊन प्रमुख शाळांबाहेरील रस्त्यांवर ठरावीक दोन रंगांची नक्षी काढून वाहनचालकांना पूर्वसूचना देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.



### असा होणार फायदा

» शाळेबाहेरील रस्त्यांवर ३० फुटांपर्यंत पांढऱ्या, पिवळ्या रंगाच्या नक्षीमुळे वाहनचालकांना शाळा असल्याचे लक्षात येईल. शाळा सुटण्यापूर्वीच नाही, तर इतरवेळी देखील शाळेचा परिसर असल्याचे स्पष्ट होऊन वाहनचालकांना वेग कमी करण्याचे संकेत मिळतील. वेग नियंत्रित झाल्याने अपघात किंवा अडचण न राहता सुरक्षितता निश्चित करता येणार आहे.

शहरातील शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता निश्चित करणे ही पुणे महानगरपालिकेची प्राथमिकता आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रमुख रस्त्यांवर उपक्रम राबविला जाणार आहे. शहरातील वर्दळीची सात ते आठ ठिकाणे यासाठी निश्चित करण्यात आली आहेत.
- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका


# बटरफ्लाय पूल उभारणीस विलंब; ठेकेदारावर कारवाई

## दिवसाकाठी दहा हजारांचा दंड; मुदत संपूनही काम कासव गतीने सुरु असल्याने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने पवना नदीवर चिंचवड-थेरगाव असा बटरफ्लाय आकारात पूल बांधण्यात येत आहे. मुदत संपूनही काम कासव गतीने सुरू असल्याने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात आली आहे. त्याला दिवसाला दहा हजार रुपये दंड करण्यात येत आहे. पूल तयार होत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिराजवळून आणि थेरगाव येथील प्रसूनधाम हाउसिंग सोसायटीशेजारी 18 मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर हा बटरफ्लाय पूल बांधण्यात येत आहे. त्याचे काम 2017 मध्ये सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी 25 कोटी 19 लाख रुपयांची निविदा काढली होती. धनेश्वर कन्स्ट्रक्शनने 14 टक्के जास्त दराने 28 कोटी 71 लाख दराने काम देण्यात आले. काम दीड वर्ष मुदतीमध्ये पूर्ण झाले नाही. कामास 31 ऑक्टोबर



### ठेकेदार, सल्लागारावर कारवाईची मागणी

» फुलपाखरू पुलाच्या कामात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप चिंचवडचे भाजप आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत केला. पुलावर ३९.७४ कोटी रुपये खर्च करूनही सात वर्षांत काम पूर्ण का झाले नाही. या प्रकरणाची चौकशी टाटा कन्सल्टन्सी किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीओईपी) तज्ज्ञांमार्फत करावी. ठेकेदार, सल्लागाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणीही त्यांनी केली.

2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली

मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे ठेकेदारावर दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. ७ सप्टेंबर २०२४ पासून दिवसाला दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येत आहे. दंडाची रक्कम देयकामधून वसूल केली जाईल. मार्चअखेर काम पूर्ण होईल, असे कार्यकारी अभियंता किरण अंधुरे यांनी सांगितले.

त्यात मुख्य पुल व पोहोच रस्त्याच्या काम होते. जलसंपदा विभागाच्या नियमानुसार पुलाच्या उंचीचे नियोजन केल्याने पुलाच्या उंचीत वाढ करण्यात आली. मूळ निविदा रकमेमध्ये पुलाचे काम पूर्ण करणे शक्य नसल्याचे सांगत उर्वरित काम करण्यासाठी नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात आले. पुलासाठी थेरगाव बाजूकडील पोहोच रस्त्यास भिंत बांधणे, मुरूम भराव करणे, रस्त्याचे काम, डांबरीकरण, तसेच, चिंचवड बाजूकडील रस्त्याचे सबग्रेडचे काम, डांबरीकरण आणि दिशादर्शक फलक अशी कामे पूर्ण करण्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविली. ते 11 कोटी 3 लाख रुपयांचे खर्चाचे काम एस.सी.कटारिया या ठेकेदाराला दिले. मात्र, अद्याप हे काम पूर्ण झाले नाही. पुलाच्या कामांवर तब्बल 39 कोटी 74 लाख रुपये खर्च होऊनही नागरिकांना पुलाची प्रतीक्षा करावी लागत आहे.

ऑगस्ट 2023 मध्ये उर्वरित कामाचे आदेश देण्यात आले. मुदतीमध्ये सप्टेंबर 2024 पर्यंत काम न झाल्याने 7 सप्टेंबर 2024 पासून प्रतिदिवस 10 हजार रुपयांची दंड ठेकेदाराला करण्यात येत आहे. 26 जानेवारी 2025 पर्यंत काम पूर्ण करण्याच्या सक्त सूचना ठेकेदाराला दिल्या होत्या. मार्च महिना आला तरी, अद्याप काम अपूर्ण अवस्थेत आहे.

### मार्चअखेरपर्यंत पुलाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन

» मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे एस. सी. कटारिया या ठेकेदाराला दंडात्मक कारवाई केली आहे. सात 7 सप्टेंबर 2024 पासून प्रत्येक दिवसाला 10 हजार रुपयांचा दंड केला जात आहे. दंडाची रक्कम बिलातून वसुल केली जाणार आहे. पुलाचे काम मार्चअखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे कार्यकारी अभियंता किरण अंधुरे यांनी सांगितले.

# प्रशासकीय राजवटीत उदंड झाले दौरे, आता अधिकारी लडाख दौऱ्यावर

## केरळ, अहमदाबाद दौऱ्यानंतर आता लडाख येथील दोन संस्थांमध्ये सहा दिवसांचा प्रशिक्षण दौरा काढण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतील प्रशासकीय राजवटीत अधिकाऱ्यांचे अभ्यास दौऱ्यांवर दौरे सुरू आहेत. केरळ, अहमदाबाद दौऱ्यानंतर आता लडाख येथील दोन संस्थांमध्ये सहा दिवसांचा प्रशिक्षण दौरा काढण्यात येत आहे. त्यासाठी १६ लाखांचा खर्च केला जाणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

काही महिन्यांपूर्वी आयुक्तांसह सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुबई दौरा केला होता. त्यानंतर करसंकलन विभागाचे अधिकारी अभ्यास दौऱ्यासाठी केरळला जाऊन आले. तसेच, नगररचना विभागाचे अधिकारी अहमदाबाद येथे प्रशिक्षण दौऱ्यावर गेले आहेत. या दौऱ्यानंतर आता शिक्षण विभागाचा लडाख दौरा आहे. शिक्षण विभागाच्या या दौऱ्यात अतिरिक्त




आयुक्तांसह एकूण ३० अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होणार आहेत. प्रवास, निवास, भोजन खर्चासह प्रशिक्षणाकरिता प्रतिव्यक्ती जीएसटीसह ५१ हजार ९०६ रुपये खर्च येणार आहे. या संपूर्ण दौऱ्याकरिता १५ लाख ५७ हजार ६०० रुपये खर्च केला जाणार आहे.

ए ज्यु के श न ल अँ ण्ड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख ही संस्था विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करते. हिमालयीन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हज् ही लोकांना त्यांच्या स्थानिक गरजा पूर्ण करण्यासाठी कौशल्ये शिकवून पर्यायी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते. या दोन्ही प्रकल्पांची कौशल्ये पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील शिक्षकांनी आत्मसात करून त्याचे धडे शालेय विद्यार्थ्यांना द्यावेत, यासाठी दौऱ्याचे नियोजन केले आहे. महापालिकेच्या शाळांतील २५ शिक्षक, याशिवाय सेवाभावी संस्थांचे तीन प्रतिनिधीदेखील या दौऱ्यात सहभागी होणार आहेत. सहा दिवसांचा हा दौरा आहे. प्रशासकीय राजवटीला गुरुवारीच तीन वर्षे पूर्ण झाली. नगरसेवक असताना आयुक्तांसह अधिकाऱ्यांवर त्यांचा वचक असतो. मात्र, प्रशासकीय राजवटीत अधिकाऱ्यांवर कोणाच वचक नाही. प्रशासकीय राजवटीत आत्तापर्यंत अधिकाऱ्यांचे पाच अभ्यास दौरे झाले आहेत. या प्रकल्पांची कौशल्ये पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील शिक्षकांनी आत्मसात करून त्याचे धडे शालेय विद्यार्थ्यांना द्यावेत, यासाठी दौऱ्याचे नियोजन केले आहे.

### तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट

» महापालिकेत १३ मार्च २०२२ पासून नगरसेवक नाहीत. विविध कारणांमुळे महापालिका निवडणुका लांबल्या आहेत. त्यामुळे आयुक्तच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. प्रशासकीय राजवट सुरू आहे. या प्रशासकीय राजवटीला गुरुवारीच तीन वर्षे पूर्ण झाली. नगरसेवक असताना आयुक्तांसह अधिकाऱ्यांवर त्यांचा वचक असतो. मात्र, प्रशासकीय राजवटीत अधिकाऱ्यांवर कोणाच वचक नाही. प्रशासकीय राजवटीत आत्तापर्यंत अधिकाऱ्यांचे पाच अभ्यास दौरे झाले आहेत. या दौऱ्यांवर लाखो रूपयांचा खर्च झाला आहे.

# महिला बचत गटाच्या जिल्हास्तरीय वस्तूंच्या प्रदर्शनाचे दोनदा उद्घाटन

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे या दोघींनीही या प्रदर्शनाचे उद्घाटन केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील शारदा प्रांगणात बारामती नगरपालिका यांच्या वतीने महिला आर्थिक विकास महामंडळ आयोजित महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या जिल्हास्तरीय वस्तूंचे भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात महिलांनी आपला उत्स्फुर्त सहभाग नोंदविला होता. मात्र, या प्रदर्शनाचे उद्घाटन दोन वेळा करण्यात आले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे या दोघींनीही या प्रदर्शनाचे उद्घाटन केले आहे. या उद्घाटनावरून श्रेयसाठीची लढाई सुरू झाल्याची चर्चा स्थानिक नागरिकांत रंगू लागली आहे.




महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले आणि काही काळानंतर बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. बारामतीकरांनी मला निमंत्रित केलं होतं, म्हणून मी या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी आले, बाकी मला माहित नाही, अशी प्रतिक्रिया रुपाली चाकणकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तसेच मी वेळेवर आले आणि उद्घाटन केले, मात्र माझ्यानंतर कोणी केव्हा आले आणि उद्घाटन कोणी कुणी केले हे बाकी मला माहीत नाही, याबाबत तुम्ही प्रशासनाला विचारा असे देखील त्या म्हणाल्या. यातून त्यांनी सुप्रिया सुळे यांच्या नावाचा उल्लेख करणे टाळले.

मला बचत गटाच्या उद्घाटनासाठी दुपारी चारची वेळ देण्यात आली होती, याबाबतची माहिती कृपया आपण प्रशासनाला विचारावी, मी स्थानिक खासदार म्हणून मला दुपारी चारची वेळ देण्यात आली असल्यामुळे मी दुपारी चार वाजता उद्घाटनासाठी आले आहे, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन दोन वेळा झाले असेल तर मला ही प्रशासनाला याबाबत विचारणा करावीच लागणार आहे, असे देखील सुळे यावेळी बोलताना म्हणाल्या.

### नवतेजस्विनी जिल्हास्तरीय महोत्सव 2025

» बारामतीनगर परिषद बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने माविम सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा अंतर्गत "नवतेजस्विनी जिल्हास्तरीय महोत्सव २०२५" महिला बचत गट उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व विक्री महोत्सव पार पडला. आयोजन केले होते. या महोत्सवात बचत गटातील महिलांनी तयार केलेले घरगुती मसाले, विविध दुग्धजन्य पदार्थ विविध प्रकारच्या डाळी, गृहपयोगी वस्तू, वस्त्र, सौंदर्य प्रसाधने आदींची स्टॉल लावण्यात आले.

बारामती नगरपालिका आणि शासकीय अधिकारी यांनी मला निमंत्रण दिल्यामुळे मी प्रदर्शनाचे उद्घाटनासाठी आले आहे, मला उद्घाटनची वेळ सुद्धा दुपारी चारची दिली होती, मी वेळेवर आले आणि उद्घाटन केलं,मात्र माझ्यानंतर कोणी केव्हा आले आणि उद्घाटन कोणी कुणी केलं हे बाकी मला माहीत नाही, याबाबत तुम्ही प्रशासनाला विचारा असे सांगून बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा नाम उल्लेख त्यांनी टाळला.

याबाबतचे पत्रही प्रशासनाकडून मला देण्यात आले होते, पत्राचा मान राखून मी कार्यक्रमाला उपस्थित राहिले, जर या प्रदर्शनाचे उद्घाटन दोन वेळा झाले असेल तर मला ही प्रशासनाला याबाबत विचारणा करावीच लागणार आहे, असे खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. एकंदरीत बारामती दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाकडून कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्यामुळे श्रेया साठी लढाई चालू असल्याचे दिसून आले, अशी चर्चा बारामतीतल्या स्थानिक लोकांमध्ये चालू होती.

# अंड्याचे दर गडगडल्याने पोल्ट्री उत्पादक आर्थिक अडचणीत

## शासनाने अंडी उत्पादक शेतकऱ्यांना प्रति अंड्यामागे अनुदान द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

बाजारामध्ये अंड्याचे दर गडगडल्याने अंडी उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. अंड्याचा उत्पादन होणारा खर्च आणि प्रत्यक्षात विक्रीतून मिळणारे पैसे यामध्ये अंडी उत्पादक शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. शासनाने अंडी उत्पादक शेतकऱ्यांना प्रति अंड्यामागे अनुदान द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शासनाने अंडी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य न केल्यास अंडी उत्पादन करणारे पोल्ट्री व्यावसायिक आर्थिक अडचणीत येऊन त्यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सद्यस्थितीत दिसून येत आहे.




ग्रामीण भागात शेतीबरोबरच पोल्ट्री व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात केला जात असून अनेक वाडी वस्तीवर शेतकऱ्यांनी आपल्या शेतात मोठमोठे पोल्ट्री व्यवसाय सुरू केले आहे. या पोल्ट्री व्यवसायात कोंबडी व अंडी व्यवसाय स्वतंत्र केला जात असून सध्या दोन्ही व्यवसायिक अडचणींत आले आहेत. अंडी व्यवसायिक यांच्याकडून अंडे खरेदी करणाऱ्या कंपनीने खरेदी दर कमी केला असून ४ रूपये दराने अंडे खरेदी केली जात आहे. एक अंडी उत्पादनासाठी जवळपास ४ रुपये ५० पैसे खर्च येतो. काही दिवसांपूर्वी थंडीच्या दिवसात ६ रूपये खरेदी दर होता तो २ रुपयांनी कमी झाल्याने कोंबड्यांचा खाद्याचा खर्च करणे देखील अवघड झाले आहे. अंडी पोल्ट्री व्यावसायिकांकडून चार रुपये दराने अंडी खरेदी केली जात आहे. होलसेल विक्रेता ते दुकानदारांना साडेचार ते पाच रुपयाला विकत आहे.

दुकानदार ग्राहकाला सात ते साडेसात रुपयाला विकत आहे. यात होलसेलर व दुकानदार यांना चांगल्या प्रकारे नफा मिळत आहे. मात्र, अंडी उत्पादन करणारा व्यावसायिक मात्र अडचणीत

> अंडी देणारी लेयर कोंबडी खरेदी करावी लागते. तिची किंमत तीनशे रुपये आहे.एका कोंबडीला दिवसाला ११० ते १२० ग्रॅम खाद्य लागते.ती दिवसाला एक अंडे देते. तिच्या एका अंड्याचा उत्पादन खर्च अंदाजे ४ रुपये ५० पैसे असून चार रुपयाला अंडे खरेदी झाल्यास ५० पैशांचा तोटा एका अंड्यामागे सध्या आम्हाला सहन करावा लागत आहे. त्यात उष्णतेमुळे अंडी देणारी कोंबडी दगावली तर मोठे नुकसान होत आहे. याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे. देशात अंड्याचे मार्केट मोठे आहे. अंड्याच्या मार्केट कमिटीत शासनाचा प्रतिनिधी ठेवून अंड्याचे दर स्थिर कसे राहतील यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवेत.
>
> **- मारूती बढेकर, अंडी व्यावसायिक, वैदवाडी**

आला आहे.अंड्याची पोल्ट्री तयार करण्यासाठी मोठा खर्च येतो. दहा हजार कोंबड्यांची पोल्ट्री बनवण्यासाठी एक कोटी खर्च येतो. एवढा खर्च करूनही अंड्याला बाजारभाव मिळत नसल्याने अंडी उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शासनाने अंडी उत्पादक शेतकऱ्यांना प्रति अंड्यामागे अनुदान द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शासनाने अंडी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य न केल्यास अंडी उत्पादन करणारे पोल्ट्री व्यावसायिक आर्थिक अडचणीत येऊन त्यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सद्यस्थितीत दिसून येत आहे. शासनाने पशु खाद्य निर्मितीसाठी आणि लेयर कोंबडी खरेदीसाठी अनुदान दिले पाहिजे, शासनाने मदत करावी.अशी मागणी वैदवाडी येथील अंडी उत्पादक शेतकरी सागर प्रकाश तापकीर यांनी दिली.